दिलीप साहेबराव परामणे वै.
वि.
दिलीप बाजीराव परामणे वगैरे

**नियमीत दिवाणी दावा क्र. ८३/२०२४ मधील नि. २० वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.११–प्रभावती शिवाजीराव परामणे हिचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांचे कथन की, प्रतिवादी क्र. ११–प्रभावती या दि. १६.०९.२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्यांना हिंदु कायदयानुसार मुलगे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे, दाव्याच्या अंतिम निराकरणासाठी कायदेशीर वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. ११ यांना विठठल शिवाजी परामणे व शहाजी शिवाजी परामणे अशी दोन मुले कायदेशीर वारस आहेत. सदरची दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीने दाव्यात कोणताही बदल होत नाही, वादाचे अंतिम निराकरण करणेसाठी सदरची दुरुस्ती अत्यंत आवश्यक आहे. सबब, वादींनी विनंती केली की, प्रतिवादी क्र. ११ चे वारस अभिलेखावर घेवुन तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी.

०३. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादी क्र. ०१ यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुर करणेस हरकत घेतली. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, दि. १६.०९.२०२४ रोजी प्रतिवादी क्र. ११ ही मयत असताना दोन महिने उशीरा वारस अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज केलेला आहे. तो मुदत बाहय आहे. सबब, प्रतिवादींनी अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

०४. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञाचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०४. वादींनी प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव व निरंतर ताकीद मिळणेसाठी

दाखल केला आहे. तसेच, प्रस्तुतची दावा ही स्थावर मिळकतीबाबत असल्याने वादी यांचे हितसंबध दाव्यात गुंतलेले असल्याने, त्याचा न्यायनिवाडा होण्यासाठी मयत प्रतिवादी क्र.११–प्रभावती शिवाजी परामणे हिचे अर्जात नमुद वारस अभिलखावर घेणे न्यायोचीत होईल. सदरची दुरुस्ती ही मुदतीत आहे. परंतु, अर्जामध्ये वादीने प्रतिवादी क्र. ११ चे वारस नजरचुकीने ७अ व ७ब वर घेण्याबाबत कथन केले आहे. या संदर्भात वादीचे विधीज्ञ यांनी युक्तिवाद करते समयी ७अ व ७ब ऐवजी ११अ व ११ब असे समजण्यात यावे अशी विनंती केली. त्यामुळे, दाव्यातील गुंतागुंत टाळणेसाठी तसेच प्रस्तुत दावा निकाली करण्यासाठी मयत प्रतिवादी क्र.११–प्रभावती हिचे वारस अभिलेखावर घेणेबाबतचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. वादी यांचा नि.क्र. २० वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.११–प्रभावती शिवाजी परामणे हिचे वारस अभिलेखावर घेवुन तशी दुरुस्ती दाव्यामध्ये या आदेशापासुन १४ दिवसाचे आत विनाकसुर करावी.

३. प्रस्तुतची दाव्यामध्ये उपरोक्त कालावधीत दुरुस्त करणेत आली नाही तर प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात आलेचे समजावे.

VIKRAM AMBADAS AVHAD

Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2025.09.24 17:35:01 +0530

**दिनांक** – २४.०९.२०२५

(डॉ. विक्रम अं. आव्हाड)

**ठिकाण** – मेढा

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा**